| MHJN060019072016 | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन यांचे न्यायालयातील**<br>(पिठासीन अधिकारी मयुरेश आर. काळे) |
|---|---|

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७६८/२०१६** **निशाणी–३१**

तक्रारदार :– दादाराव नामदेव घायवट,
वयः ६५ वर्षे,
धंदाः शेती, रा. दावतपुर, ता. भोकरदन, जि. जालना.

प्रतिनिधित्व :– विधीज्ञ श्री. डब्लयु. एन.जंजाळ

**–विरूध्द–**

आरोपी :– उत्तम गोविंदा घायवट,
वयः ४६ वर्षे,
धंदाः शेती, रा. दावतपुर, ता. भोकरदन, जि. जालना.

प्रतिनिधित्व :– विधीज्ञ श्री. पी.टी.शिरसाट

**''भाग ब''**

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | १३.१२.२०१६ |
| तक्रार दाखल दिनांक | १९.१२.२०१६ |
| प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक | १२.०६.२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | १८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १८.०४.२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असेल | –– |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली किंवा मुक्त केले | किती शिक्षा झाली | पुर्वी तुरूंगात असल्यास तो काळ वजा केलेला असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तम गोविंदा घायवट | -- | १२.०६.२०२४ | भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४,५०६,४२७ | निर्दोष मुक्त केले | -- | --- |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक १८.०४.२०२६)

प्रस्तुत खटला हा भारतीय दंड संहिताचे कलम ३२३,५०४,५०६ व ४२७ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

**तक्रारदार यांचे कथन –**

०२. आरोपीने दिनांक १३.१२.२०१६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मौजे दावतपुर येथे फिर्यादी यांच्या गट क्र. ९७ मधील ८० आर क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या विहीरीवर कोणताही हक्क अथवा संबंध नसताना जबरदस्तीने मोटार बसवुन आरोपीशी वाद घातला. तसेच फिर्यादीने त्यास सदर मोटार उचलुन नेण्यास सांगितले असता आरोपीने फिर्यादीस त्यास उपजिल्हाधिकारी साहेबांनी सदर विहीरीत व जमीनीत हिस्सा दिला आहे असे म्हणुन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली.तसेच आरोपीने फिर्यादीस लोटलाट करुन मारहाण केली व सदर विहीरीवर पाय टाकल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. सदर भांडण साक्षीदार क्र. १ व २ यांनी पाहिले असुन त्यांनी सोडविले. तसेच

यापुर्वी देखील आरोपीने फिर्यादीच्या शेतातील झाडे तोडुन बेकायदेशीररीत्या विक्री केलेली असल्याचे कथन फिर्यादीने केले आहे. आरोपीने फिर्यादीचे रक्कम रुपये २५,०००/– चे नुकसान केले अशा आशयाचा खटला फिर्यादीने भा.दं.वी.चे कलम ३२३,५०४,५०६ व ४२७ अन्वये आरोपीविरुध्द दाखल केला आहे.

०३. निशाणी क्र.२५ कडे आरोपीचे प्रतिकथन नोंदविण्यात आले.

०४. तक्रारदारतर्फे संपरीक्षेमध्ये प्रगती होण्याबाबत योग्य ती तजवीज न करण्यात आल्याने दिनांक २३.१२.२०२५ रोजी फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच अभिलेखावर आरोपीस गुन्ह्यामध्ये गुंतविणारा कोणताही पुरावा न आल्याने फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

०५. फिर्यादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रे विचार करुन प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी मी खालीलप्रमाणे विचारार्थी मुद्दे निश्चित केले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १३.१२.२०१६ रोजी दुपारी ०१.०० वाजण्याच्या सुमारास मौजे दावतपुर येथे आरोपीने फिर्यादीला लोटलाट करुन मारहाण केली व ईच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे कलम ३२३ भारतीय दंड सहिता,१८६० प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन जाणुन–बुजुन अपमानित करुन त्यांनी सार्वजनिक शांततेचा भंग करावा या उद्देशाने चिथावणी दिली व त्यायोगे कलम ५०४ भारतीय दंड संहिता, १८६० प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला भिती वाटावी या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे कलम ५०६ भारतीय दंड संहिता, १८६० प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या शेतातील झाडे तोडुन बेकायदेशीर विक्री करुन त्याचे नुकसान केले व त्यायोगे कलम ४२७ भारतीय दंड संहिता, १८६० प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी |
| ५. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करीताः–**

०६. हे कायद्याचे प्रस्थापित तत्त्व आहे की अभिलेखावर कागदपत्रे दाखल करणे व ती कागदपत्रे योग्य त्या मार्गाने सिद्ध करुन घेणे या दोन विभिन्न बाबी आहेत. प्रस्तुत कामी फिर्यादीतर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याबाबत कोणताही स्वतंत्र पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. सबब केवळ तक्रारीमध्ये नमुद केलेली कथने ही आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यास उपयुक्त नाही. सबब वर नमुद कारणांचा विचार करुन मी मुद्दा क्र.१ ते ४ करीता निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. आरोपीची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३,५०४,५०६ व ४२७ अन्वये दंडनीय असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.
२. आरोपीचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावे.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

Digitally signed by MAYURESH RAJEEV KALE
Date: 2026.04.18 15:16:33 +0530

भोकरदन. (मयुरेश आर. काळे)
दिनांकः १८.०४.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | G.M.Padol |
| Court | : | CJJD & JMFC, Bhokardan |
| Date | : | 18.04.2026 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 18.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 18.04.2026 |